# समर्पण

यश मिळत नसेल तर सिद्धांत बदला, मार्ग बदला...
अनेक मार्ग असेही समोर पर्याय म्हणून उभे असतात, आपल्याला माहीत नाहीत असं नसतं, सदगुरूंना शरण असणाऱ्याने असा सल्ला कितपत आणि खोलवर मनावर घ्यावा?, सल्ला लिहीणं सोपं आहे मार्ग बदलायला जाणं, म्हणजे सिद्धांत डावलणे हे त्यात आलेच बरं, सिद्धांत आपणच बनवले असतील तर सोईस्कर रीतीनं बदलता येतात, ते आज्ञेत आले असतील तर बदलणे आपले अधिकार नाहीत

चालू उपासना, विवेक यांना फाटे का आणि कसे द्यावेत?, जर समर्पणातून ते आले आहेत, त्याचे कवच तुमच्या भवती असतेच, त्या श्रद्धेवर महत्वाच्या अडचणीतून आपण मार्ग काढतो, व पुढे जातो, मग जर सिद्धांत बदलले तर ते कवच, ती संरक्षित स्पंदने, आणि तो आशीर्वादाचा पाठिंबा आपण अपेक्षा करायला पात्र आहोत का?, एखादी व्यावहारिक अडचण सिद्धांत बदलून टळेल, पण आपल्या कुवतीच्या बाहेरची अडचण आली तर कुठल्या तोंडाने महाराजांकडे जाल !!!

लौकिक प्रगती आणि संपत्ती कुठल्या देही व्यक्तीला नकोय हो?, त्यातही नुकसान सोसून, वाट पाहून कार्य चालू राहत असेल तर ही चिंतेची बाब आहे की, एक पाऊल महाराजांच्याकडे अजून पडलंय हा आपल्या श्रद्धेची ताकद किती आहे याचा खुलासा आपल्याला एकांतात करेल.

www.saarthbodh.com

मुबलकता कुणाला नकोय, मन अपेक्षा करत नसेल?, नियम मोडायची इच्छा होत नसेल?, करून बघूया वाटत नसेल? परवानगी घेऊया का असे विचार येत असतील का?, ज्याचा त्याचा प्रश्न !!!

बाकी शुद्ध अविनाशी श्रीसद्गुरू चरणी सर्व हक्क समर्पित

© स.पु.
www.saarthbodh.com
सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी